महासत्ता एकच आवृत्ती 15 NOV 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा १८ रोजी वर्धापन दिन

**कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)-**
..................................

शिवाजी विद्यापीठाचा ६९ वा वर्धापन दिन गुरुवार दि.१८ नोव्हेंबर रोजी साजरा करण्यात येणार असून या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या सोहळ्यात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्य, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव होणार असल्याचे कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

महासत्ता एकच आवृत्ती

15 NOV 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नऊ प्राध्यापक

कोल्हापूर, ता.२ (प्रतिनिधी)–

................................

जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची ताजी यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली असून त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या नऊ संशोधकांना पुनर्मानांकन प्राप्त झाले आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाने गत वर्षी जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या यादीमध्येही शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना स्थान लाभले होते. यंदा स्टॅनफोर्डने वेगवेगळ्या प्रकारच्या सूची जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एक सूची संशोधकांच्या सार्वकालिक कारकिर्दीचा वेध घेऊन तयार केली आहे, तर दुसरी वार्षिक कामगिरीवर आधारित आहे.

सार्वकालिक कामगिरीवर आधारित जाहीर केलेल्या यादीमध्ये विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील (पदार्थविज्ञान), डॉ.केशव राजपुरे (पदार्थविज्ञान), डॉ.ए.व्ही.राव (पदार्थविज्ञान), प्रा.सी.एच. भोसले (पदार्थविज्ञान) आणि डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र) यांचा समावेश आहे.

वार्षिक कामगिरीवर आधारित यादीमध्येही उपरोक्त संशोधकांचा समावेश आहे. त्यांच्यासह डॉ.ए.व्ही.मोहोळकर (पदार्थविज्ञान), डॉ. संजय लट्ठे (नॅनो सायन्स), डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनो सायन्स) आणि डॉ.के.एम.गरडकर (रसायनशास्त्र) यांचा समावेश आहे. ए. डी. सायंटिफिक इंडेक्स क्रमवारीपाठोपाठ सलग दुसऱ्या दिवशी विद्यापीठीय संशोधनाच्या जागतिक दर्जावर शिक्कामोर्तब करणारी वार्ता प्राप्त झाली आहे.

15 NOV 2021 महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवाची ऊर्जा जीवनाला आनंददायी बनवते-डॉ.गुरव

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

युवा महोत्सवाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाने अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कलाकार घडविले आहेत. जीवनातील अडचणी व नैराश्यावर मात करण्यासाठी या युवा महोत्सवाची उर्जा जीवनाला आनंददायी बनवते. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन अत्यंत महत्वाचे आहे,असे विचार शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी मांडले.

शिवाजी विद्यापीठ व विवेकानंद कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कोल्हापूर जिल्हा एकदिवसीय युवा महोत्सव कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे होते. विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी, प्राचार्या शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. डी.जी.चिघळीकरांनी मार्गदर्शन केले.मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी कलेची माध्यमे व सादरीकरणाविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी महाविद्यालयीन कामगिरीचा आढावा घेतला.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रांतर्गत व्दितीय व तृतीय वर्षाचे प्रवेश नि परीक्षा अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. ५ डिसेंबर ऑनलाईन अर्जाची शेवटची तारीख आहे. विद्यापीठ दूरशिक्षण केंद्रांतर्गत सातारा व सांगली या दोन विभागीय केंद्रासह अभ्यासकेंद्रात 'यूजीसी' मान्यताप्राप्त बीए, बी.कॉम, एम.ए. (भाषा), एम.ए. (सामाजिकशास्त्रे), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात आले आहे. प्रवेश शुल्क ऑफलाईन, ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाशी संपर्क साधण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर. पळसे यांनी केले आहे.